# <u>महाराष्ट्र शासन</u>

सामान्य प्रशासन विभाग

**लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य या संस्थेचे अध्यक्ष म्हणून निवडले जाण्याकरीता निवड समितीसमोर विचारार्थ नावे सादर करण्यासाठी अर्हताधारकांकडून अर्ज मागविण्यासाठी जाहिरात.**

क्र.एलपीएल २०२६/प्र.क्र.४१/लोकआ — जाहिरात क्रमांक ०२/२०२६

लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य या संस्थेचे अध्यक्ष म्हणून निवडले जाण्याकरीता निवड समितीसमोर विचारार्थ नावे सादर करण्यासाठी पात्र व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ व महाराष्ट्र लोक आयुक्त (सुधारणा) अधिनियम, २०२५ सामान्य प्रशासन विभागाच्या **www.gad.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ज्यामध्ये लोक आयुक्त संस्थेचे अध्यक्ष म्हणून निवडीसाठीची पात्रता, निकष तसेच वैधानिक तरतुदी उपलब्ध आहेत.

अध्यक्षांचा पदावधी, वेतन आणि भत्ते अनुक्रमे महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ च्या कलम ६ आणि ७ मधील तरतुदींनुसार असतील.

**पात्र आणि इच्छुक उमेदवारांचे, विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज दि. २३ जुलै, २०२६ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत पोहोचले पाहिजेत. सदरचे अर्ज हे अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, ६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ या पत्त्यावर किंवा desk15.gad-mh@gov.in / acs.gadservices@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर दि. २३ जुलै, २०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत पाठवावेत.**
**उपरोक्त पत्ता / ई-मेल आयडीवर अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक व वेळ ही अंतिमत: ग्राह्य धरण्यात येईल.**
**अंतिम मुदतीनंतर आणि विहित वेळेनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.**

ठिकाण : मुंबई — (निता शिंदे)
दिनांक : ०९ जुलै, २०२६ — उप सचिव, महाराष्ट्र शासन

**लोक आयुक्त या संस्थेचे अध्यक्ष म्हणून निवडले जाण्याकरीता निवड समितीसमोर विचारार्थ नावे सादर करण्यासाठी पात्र व्यक्तींकडून अर्ज मागवण्याबाबत तपशील आणि पात्रता निकष**

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
दिनांक: ०९ जुलै, २०२६

लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य या संस्थेचे अध्यक्ष म्हणून निवडले जाण्याकरीता निवड समितीसमोर विचारार्थ नावे सादर करण्यासाठी पात्र व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ (यापुढे लोक आयुक्त अधिनियम म्हणून संदर्भित) च्या संबंधित तरतुदींनुसार अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर अधिनियम सामान्य प्रशासन विभागाच्या www.gad.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल.

३. लोक आयुक्त संस्थेमध्ये एक अध्यक्ष असतील.

४. **पात्रता निकष :-**

**लोक आयुक्त संस्थेचे अध्यक्ष म्हणून नियुक्तीसाठी** (कृपया लोक आयुक्त अधिनियमाचे कलम ३ (२) (क) पहा)

कोणतीही व्यक्ती जी -

➤ उच्च न्यायालयाची मुख्य न्यायाधीश किंवा सर्वोच्च न्यायालयाची न्यायाधीश किंवा मुंबई उच्च न्यायालयाची न्यायाधीश आहे किंवा राहिलेली आहे.

५. **वय** (कृपया लोक आयुक्त अधिनियमाचे कलम ३(४)(तीन) पहा)

अर्जदाराचे वय अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारण्याच्या तारखेला पंचेचाळीस वर्षांपेक्षा कमी नसावे.

६. **इतर पूर्वअटी ज्या पूर्ण करणे आवश्यक आहे :-**

अध्यक्ष खालीलपैकी नसावा (कृपया लोक आयुक्त अधिनियमाचे कलम ३(४) पहा) -

(i) संसदेचा सदस्य किंवा कोणत्याही राज्याच्या किंवा संघराज्य क्षेत्राच्या विधानमंडळाचा सदस्य;

(ii) नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषसिद्ध ठरलेली व्यक्ती.

(iii) कोणत्याही पंचायत, जिल्हा परिषद, नगर पंचायत, नगर परिषद किंवा महानगरपालिकेचा सदस्य;

(iv) राज्य शासनाकडून भरीव प्रमाणात वित्तपुरवठा केला जात असलेल्या कोणत्याही संस्था,

महामंडळ किंवा सोसायटीचा सदस्य;
(v) केंद्र किंवा राज्याच्या सेवेतून काढून टाकलेली किंवा बडतर्फ केलेली व्यक्ती,

आणि अध्यक्ष हा कोणतेही विश्वस्ताचे किंवा लाभाचे पद (अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून असलेल्या तिच्या पदाव्यतिरिक्त) धारण करणार नाही; किंवा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असणार नाही किंवा कोणताही धंदा किंवा व्यवसाय करणार नाही आणि अध्यक्ष म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती, त्यानुसार पदग्रहण करण्यापूर्वी -

(अ) जर तो कोणतेही विश्वस्ताचे किंवा लाभाचे पद धारण करत असेल, तर तो त्या पदाचा राजीनामा देईल; किंवा

(ब) जर तो कोणताही धंदा करत असेल, तर असा धंदा करण्याचे बंद करील किंवा त्याच्या व्यवस्थापनाशी संबंध ठेवणार नाही; किंवा

(क) जर तो कोणताही व्यवसाय करत असेल, तर तो व्यवसाय करण्याचे बंद करील".

## ७. निवड प्रक्रिया:

निवड प्रक्रिया आणि पद्धत महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ च्या कलम ४ च्या तरतुदींनुसार नियंत्रित केली जाईल.

## ८. **पदावधी** (कृपया लोक आयुक्त अधिनियमाचे कलम ६ पहा):

अध्यक्ष पदभार स्वीकारल्याच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी किंवा वयाची सत्तर वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत पद धारण करेल.

## ९. **वेतन आणि भत्ते** (कृपया लोक आयुक्त अधिनियमाचे कलम ७ पहा):

अध्यक्षाचे वेतन, भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांप्रमाणे असतील.

परंतु, जर अध्यक्षास, त्याच्या नियुक्तीच्या वेळी, भारत सरकार किंवा राज्य सरकार अंतर्गत असलेल्या कोणत्याही पूर्वीच्या सेवेच्या बाबतीत, निवृत्तिवेतन (विकलांगता निवृत्तिवेतनाव्यतिरिक्त) मिळत असेल, तर अध्यक्ष म्हणून त्याच्या सेवेच्या बाबतीत त्याचे वेतन खालीलप्रमाणे कमी केले जाईल:-

(अ) त्या निवृत्तिवेतनाच्या रकमेने; आणि

(ब) जर त्याला, अशा नियुक्तीपूर्वी, अशा पूर्वीच्या सेवेच्या बाबतीत, त्याला देय असलेल्या निवृत्ति वेतनाच्या भागाऐवजी, त्याचे अंशराशीकृत मूल्य मिळत असेल, तर त्या निवृत्ती वेतनाच्या भागाच्या रकमेने.

परंतु आणखी असे की, अध्यक्षास प्रदेय असलेले वेतन, भत्ते व निवृत्तिवेतन आणि सेवेच्या अन्य शर्ती यांमध्ये, त्याच्या नियुक्तीनंतर त्यास अहितकारक ठरतील असे कोणतेही बदल केले जाणार नाहीत.

१०. **<u>इतर संबंधित माहिती</u>**

<u>लोक आयुक्त अधिनियमाच्या कलम ८ च्या तरतुदींकडे</u> लक्ष वेधण्यात येत आहे, ज्या लोक आयुक्त संस्थेचे अध्यक्ष म्हणून सेवा केल्यानंतर खालील गोष्टींना प्रतिबंध करतात -

- लोक आयुक्त संस्थेचे अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून पुन्हा नियुक्ती;
- राज्य शासनाच्या अंतर्गत असलेल्या अन्य कोणत्याही लाभाच्या पदावरील पुढील नोकरी;

११. **<u>अर्ज कसा करावा</u>**

- लोक आयुक्त अधिनियमाच्या कलम ३ मधील तरतूदीनुसार अध्यक्ष पदाची जाहिरात तयार करण्यात आली असून ती राज्य शासनाच्या **www.maharashtra.gov.in** व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या **www.bombayhighcourt.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.
- सादर करावयाचा अर्ज (घोषणापत्र व हमीपत्रासह) महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावरील “लोक आयुक्त संस्थेच्या अध्यक्ष पदाकरीता जाहिरात” या लिंकवरून तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या **www.bombayhighcourt.gov.in** या संकेतस्थळावरून डाउनलोड करता येईल.
- जाहिरातीस अनुसरुन **पात्र आणि इच्छुक उमेदवारांचे, विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज (घोषणापत्र व हमीपत्रासह) दि. २३ जुलै, २०२६ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत पोहोचले पाहिजेत. सदरचे अर्ज हे अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, ६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ या पत्त्यावर किंवा desk15.gad-mh@gov.in/ acs.gadservices@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर दि.२३ जूलै, २०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत पाठवावेत.** सर्व अर्ज विहित नमुन्यातच केले पाहिजेत. अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक व वेळ ही अंतिमत: ग्राह्य धरण्यात येईल.
- अर्ज विहित मुदतीत उपरोक्त पत्त्यावर किंवा ईमेलद्वारे पोहोचतील याची खात्री करण्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदाराची असेल. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
- पोस्टाने अर्ज पाठविताना लिफाफ्यावर "लोक आयुक्त संस्थेचे अध्यक्ष म्हणून नियुक्तीसाठी अर्ज" असे स्पष्टपणे लिहिलेले असावे.
- विहित नमुन्यात नसलेले किंवा कोणत्याही दृष्टीने अपूर्ण असलेले अर्ज सरसकट नाकारले जातील.

# लोक आयुक्त संस्थेच्या अध्यक्ष पदाकरीता अर्ज

अर्ज भरण्यापूर्वी कृपया महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ दिनांक ८ डिसेंबर, २०२५ आणि महाराष्ट्र लोक आयुक्त (सुधारणा) अधिनियम, २०२५ दिनांक २६ डिसेंबर, २०२५ मध्ये नमूद केलेल्या वैधानिक तरतुदी, विशेषतः अध्यक्ष पदाचा पदावधी, वेतन इत्यादी आणि या अर्जासोबत जोडलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

अलीकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचा फोटो येथे चिकटवा

| | | |
|---|---|---|
| १. | नाव (कृपया संपूर्ण नाव लिहा) | |
| २. | जन्मदिनांक<br>(अंकात तसेच अक्षरांत)<br>(दिनांक/महिना/वर्ष) | |
| ३. | जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास वय (दि.०९ जुलै, २०२६ रोजी) | ------ वर्षे ------ महिने |
| ४. | लिंग | |
| ५. | सध्याचा पत्ता<br>(पिन कोडसह) | |

| | | |
|---|---|---|
| ६. | कायमस्वरुपी पत्ता<br>(पिन कोडसह) | |
| ७. | दूरध्वनी क्रमांक (एसटीडी कोडसह) | |
| ८. | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ९. | ई-मेल | |
| १०. | शैक्षणिक अर्हता | |
| ११. | सध्या नोकरी / व्यवसाय करीत असल्यास त्याचा तपशील | |
| १२. | धारण केलेले पद / हुद्दा / पदनाम | |
| १३. | अर्जदार स्वयंरोजगार करत असल्यास, स्वयंरोजगाराचे क्षेत्र नमूद करा | |

| १४. | कृपया न्यायपालिकेचा अनुभव नमूद करावा - |
|---|---|

| धारण केलेले न्यायिक पद | होय/नाही | असे पद धारण केलेला कालावधी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | एकूण अनुभव | |
| | | | | वर्षे | महिने |
| सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश | | | | | |
| उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश | | | | | |
| मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश | | | | | |

टीप १ : अर्जदाराने धारण केलेली पदे कालक्रमानुसार नमूद केलेला तपशीलवार बायोडेटा कृपया स्वतंत्रपणे जोडावा.

टीप २ : मिळालेले पुरस्कार, सन्मान आणि इतर विशेष कामगिरी दर्शवण्यासाठी स्वतंत्र जोडपत्र जोडू शकता.

टीप ३ : अर्जदाराने, ते लोक आयुक्त संस्थेमध्ये अध्यक्ष पदासाठी असलेल्या पात्रता अटी कशा पूर्ण करणार याचे तपशीलवार समर्थन करणारे एक वैयक्तिक निवेदन (२०० शब्दांपेक्षा जास्त नाही) सोबत जोडावे.

दिनांक:
ठिकाण:

अर्जदाराची स्वाक्षरी:
पूर्ण नाव:
मोबाईल क्रमांक:
ईमेल :

टीप : कृपया अर्जासोबत सादर करावयाचे घोषणापत्र आणि हमीपत्रासाठी पुढील पान पहा.

# घोषणापत्र
## (अर्जदाराने घोषित करावयाचे)

मी, ----------------------------------------, अर्जदार, याद्वारे घोषित करतो/करते की वर दिलेल्या आणि जोडलेल्या निवेदनांमधील तपशील माझ्या माहिती आणि विश्वासानुसार सत्य आणि बरोबर आहे.

२. या अर्जामध्ये असलेली कोणतीही माहिती चुकीची आढळल्यास माझा अर्ज सरसकट नाकारला जाईल याची मला जाणीव आहे.

३. महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ दिनांक ८ डिसेंबर, २०२५ आणि महाराष्ट्र लोक आयुक्त (सुधारणा) अधिनियम, २०२५ दिनांक २६ डिसेंबर, २०२५ मधील आवश्यक पात्रता आणि इतर अटी नमूद करणाऱ्या वैधानिक तरतुदींची मला माहिती आहे.

४. महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ च्या कलम ८ मधील तरतुदी या लोक आयुक्त संस्थेचे अध्यक्ष पद सोडल्यानंतर रोजगारावर निर्बंध घालतात, याचीही मला जाणीव आहे आणि हे पद सोडल्यानंतर खालील गोष्टींसाठी मी अपात्र ठरेन हे पूर्णपणे जाणून घेऊन मी त्याचे पालन करण्यास सहमत आहे:
(i) लोक आयुक्ताचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून पुन्हा नियुक्ती;
(ii) राज्य शासनाच्या अंतर्गत असलेल्या अन्य कोणत्याही लाभाच्या पदावरील पुढील नोकरी.

५. मी स्पष्टपणे घोषित करतो/करते की :-

(अ) मी संसदेचा सदस्य किंवा कोणत्याही राज्याच्या किंवा संघराज्य क्षेत्राच्या विधानमंडळाचा सदस्य नाही.
(ब) मला नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषसिद्ध ठरवण्यात आलेले नाही.
(क) मी कोणत्याही पंचायती, जिल्हा परिषदेचा, नगर पंचायतीचा, नगर परिषदेचा किंवा महानगरपालिकेचा सदस्य नाही.
(ड) मी राज्य शासनाकडून भरीव प्रमाणात वित्तपुरवठा केला जात असलेल्या कोणत्याही संस्थेचा, महामंडळाचा किंवा सोसायटीचा सदस्य नाही.
(ई) मला केंद्र किंवा राज्याच्या सेवेतून बडतर्फ किंवा काढून टाकण्यात आलेले नाही.
(फ) माझा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नाही.

दिनांक:
ठिकाण:

अर्जदाराची स्वाक्षरी:
पूर्ण नाव:
मोबाईल क्रमांक:
ईमेल :

**हमीपत्र**

मी याद्वारे महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ च्या कलम ३ (४) आणि ८ च्या तरतुदींनुसार सर्व अटींचे पालन करण्याची हमी देतो / देते आणि विशेषतः हमी देतो / देते की, निवड झाल्यास आणि अध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारण्यापूर्वी - (कृपया जे लागू नसेल ते खोडा)

(अ) सध्या धारण केलेल्या विश्वस्ताच्या किंवा लाभाच्या पदाचा, म्हणजे -------------------------------------------, राजीनामा देईन.

(ब) सध्या माझ्याद्वारे संचालित आणि व्यवस्थापित असलेल्या धंद्याशी, म्हणजे ---------------------------------------, माझा संबंध तोडेन.

(क) माझा सध्याचा व्यवसाय, म्हणजे ----------------------------------------, करणे थांबवेन.

दिनांक:
ठिकाण:

अर्जदाराची स्वाक्षरी:
पूर्ण नाव:
मोबाईल क्रमांक:
ईमेल:

**सूचना:**

१. कृपया मागितलेली माहिती दिलेल्या जागेतच नमूद करा.
२. कोणतीही अतिरिक्त माहिती द्यावयाची असल्यास संदर्भित स्तंभाखाली योग्य तो संदर्भ देऊन स्वतंत्र जोडपत्र जोडा.
३. प्रत्येक स्तंभात मागितलेली माहिती संपूर्ण आणि विवक्षित असावी, किंवा लागू नसल्यास कृपया "लागू नाही" असे नमूद करा.
४. कोणताही अर्ज थेट अध्यक्ष, निवड समितीच्या कार्यालयात पाठवल्यास त्याचा विचार केला जाणार नाही. सदरचा अर्ज दिनांक ०९ जूलै, २०२६ च्या जाहिरातीत नमूद केलेल्या पद्धतीनेच पाठवला पाहिजे.
५. संपर्क तपशील कृपया स्पष्टपणे नमूद करा.
६. अर्जाच्या संदर्भात पुढील कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
७. अर्जाच्या लिफाफ्यावर लोक आयुक्त संस्थेचे अध्यक्ष, या पदासाठी अर्ज आहे असे स्पष्टपणे नमूद केलेले असावे.
८. ईमेलद्वारे अर्ज करत असल्यास वरील अट क्र.७ नुसार विषयामध्ये (Subject) लोक आयुक्त संस्थेचे अध्यक्ष पदासाठी अर्ज, असे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.
९. अर्जाच्या समर्थनार्थ शिफारस करण्यास (Canvassing) सक्त मनाई आहे.
१०. हा अर्ज भरण्यापूर्वी महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ दिनांक ८ डिसेंबर, २०२५ आणि महाराष्ट्र लोक आयुक्त (सुधारणा) अधिनियम, २०२५ दिनांक २६ डिसेंबर, २०२५ च्या संबंधित वैधानिक तरतुदी कृपया वाचा.

# Government of Maharashtra

General Administration Department

**Inviting Applications for preparation of names for Consideration by the Selection Committee for Appointment as Chairperson of the body of Lokayukta, Maharashtra State**

**No.LPL 2026/C.R.41/LOKAY** **Advertisement No. 02/2026**

Applications are hereby invited from eligible persons for submission of names before the Selection Committee for consideration for appointment as Chairperson of the body of Lokayukta, Maharashtra State.

Maharashtra Lokayukta Act, 2023 and Maharashtra Lokayukta (Amendment) Act, 2025 are available on the website of the General Administration Department at www.gad.maharashtra.gov.in which includes qualifications, eligibility criteria and statutory provisions for selection of Chairperson of the body of Lokayukta.

The tenure, salary, and allowances of the Chairperson shall be in accordance with the provisions contained in Sections 6 and 7 of the Maharashtra Lokayukta Act, 2023.

**Duly filled-in applications in the prescribed format from eligible and interested candidates must be received on or before 23rd July, 2026 by 5:00 p.m. Applications shall be submitted either by post to the Additional Chief Secretary (Services), General Administration Department, 6th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai – 400 032, or by email at desk15.gad-mh@gov.in / acs.gadservices@maharashtra.gov.in not later than 5:00 p.m. on the said date. The date and time of receipt of the application at the above address/email ID shall be treated as final.**

**Applications received after the prescribed last date and time shall not be considered.**

Place : Mumbai (Neeta Shinde)
Date : 09th July, 2026. Deputy Secretary, Government of Maharashtra

# Details and eligibility criteria for inviting applications from eligible persons for submission of names for consideration before the selection committee for appointment as Chairperson of body of lokayukta

General Administration Department,
Mantralaya, Mumbai
Date: 09th July, 2026

Applications are invited from eligible persons for submission of names for consideration before the Selection Committee for appointment as Chairperson of the Body of Lokayukta, Maharashtra State.

2. Applications are invited in accordance with the relevant provisions of the Maharashtra Lokayukta Act, 2023 (hereinafter referred to as "the Lokayukta Act").

This Act may be accessed on the website of the General Administration Department at www.gad.maharashtra.gov.in

3. The body of Lokayukta shall consist of one Chairperson.

4. **Eligibility Criteria :-**

**For appointment as Chairperson** (Refer Section 3(2)(a) of the Lokayukta Act)

A person who is or has been Chief Justice of High Court or a Judge of Supreme Court or a Judge of Bombay High Court.

**5. Age :-** (Refer Section 3(4)(iii) of the Lokayukta Act)

The applicant shall have completed forty-five years of age on the date of assuming office as Chairperson.

**6. Other Conditions to be Fulfilled :-**

The Chairperson shall not be: (Refer Section 3(4) of the Lokayukta Act) –

(i) A Member of Parliament or Member of the Legislature of any State or Union Territory;
(ii) A person convicted of any offence involving moral turpitude;
(iii) A Member of any Panchayat, Zilla Parishad, Nagar Panchayat, Municipal Council or Municipal Corporation;
(iv) A Member of a body, corporation or society, substantially financed by the State Government;
(v) A person dismissed or removed from service of the Union or a State;

Further, a Chairperson shall not hold any office of trust or profit (other than his office as Chairperson or a Member), shall not be connected with any political party or shall not carry on any business or practice any profession and accordingly, before he enters upon his office, A person appointed as the Chairperson shall:

(a) resign from any office of trust or profit held; or
(b) discontinue any business carried on or sever connection with its management; or
(c) cease to practice any profession.

**7. Selection Process :-**

The selection process and procedure shall be governed by the provisions of Section 4 of the Maharashtra Lokayukta Act, 2023.

**8. Tenure :-** (Refer Section 6 of the Lokayukta Act)

Chairperson shall hold office for a term of five years from the date on which he/she enters upon office or until attaining the age of seventy years, whichever is earlier.

**9. Salary and Allowances :-** (Refer Section 7 of the Lokayukta Act)

The salary, allowances and other conditions of service of the Chairperson shall be the same as those of the Chief Justice of the High Court.

Provided that where a person appointed as Chairperson is in receipt of pension (other than disability pension) in respect of any previous service under the Government of India or a State Government, the salary payable shall be reduced by :

(a) the amount of such pension; and

(b) where such person has received, in lieu of a portion of the pension, the commuted value thereof, the amount of that portion of the pension.

Provided further that the salary, allowances, pension and other conditions of service of Chairperson shall not be varied to his/her disadvantage after appointment.

**10. Other Relevant Information :-**

Attention is invited to Section 8 of the Lokayukta Act, which prohibits, after ceasing to hold office:

- Re-appointment as Chairperson or a Member of the body of Lokayukta;
- Further employment under the State Government in any office of profit.

**11. How to Apply :-**

- In accordance with the provisions of Section 3 of the Lokayukta Act, the Advertisement for the post of the Chairpersons has been prepared and published on the website of the State Government www.maharashtra.gov.in and the Hon'ble High Court, Mumbai www.bombayhighcourt.gov.in
- The Application form to be submitted (along with Declaration and Undertaking can be downloaded from the link "Advertisement for the post of Chairperson of body of Lokayukta". on the Government of Maharashtra's website www.maharashtra.gov.in as well as from the website of the Hon'ble High Court, Mumbai www.bombayhighcourt.gov.in
- In accordance with the Advertisement, complete applications in the prescribed format (along with declaration and undertaking) from eligible and interested candidates must reach by 5.00 p.m. on 23rd July, 2026. This applications should be sent to the following address: The Additional Chief Secretary (Services), General Administration Department, 6th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai – 400 032 or by email to desk15.gad-mh@gov.in / acs.gadservices@maharashtra.gov.in by 5.00 p.m. on 23rd July, 2026. Applications must strictly be in the prescribed format. The date and time of receipt of the application at the above address/email ID shall be treated as final.
- The applicant shall be solely responsible for ensuring that the application reaches within the prescribed time. Applications received after the due date shall not be considered.
- The envelope containing the application must clearly superscribe: "Application for appointment as the Chairperson of body of Lokayukta".
- Applications not in prescribed format or incomplete in any respect shall be summarily rejected.

# Application for appointment as the Chairperson of body of Lokayukta

Applicants are advised to carefully read the Maharashtra Lokayukta Act, 2023 dated 8th December 2025 and the Maharashtra Lokayukta (Amendment) Act, 2025 dated 26th December 2025, particularly the provisions relating to tenure, salary and other conditions of service, before filling the form.

PLEASE PASTE A RECENT PASSPORT SIZE PHOTOGRAPH

| | | |
|---|---|---|
| 1. | Name of the applicant<br>[Please indicate the full name in CAPITAL letters] | |
| 2. | Date of Birth<br>(In Number and words)<br>DD/MM/YYYY | |
| 3. | Age as on Advertisement is Published (on 09th July, 2026) | ---------Years---------- Months |
| 4. | GENDER | |
| 5. | Present address of the applicant (with PIN code) | |

| | | |
|---|---|---|
| 6. | Permanent address of the applicant (with PIN code) | |
| 7. | Telephone No. (with STD Code) | |
| 8. | Mobile Number | |
| 9. | E-mail | |
| 10. | Educational Qualification | |
| 11. | Details of present employment/occupation, if any | |
| 12. | Post/Position held/ Designation | |
| 13. | In case the applicant is Self Employed, please indicate the area of Self Employment | |

14. Mention present or former Judiciary Experience.

| JUDICIAL POSITION HELD | YES / NO | Period during which such position was held | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | FROM | TO | TOTAL EXPERIENCE | |
| | | | | YEARS | MONTHS |
| Judge of Supreme Court | | | | | |
| Chief Justice of High Court | | | | | |
| Judge of Bombay High Court | | | | | |

NOTE 1: Please attach a detailed curriculum vitae which may also indicate the positions held by the applicant in a chronological order

NOTE 2: A separate sheet may also be attached to reflect awards, honors received and any other special achievements.

NOTE 3: Please enclose a personal statement, (not exceeding 200 words) providing a detailed justification as to how you (applicant) fulfill the conditions of eligibility for the position of Chairperson in the body of Lokayukta.

Date: Signature of the applicant:

Place: Name in full:

Mobile No.:

Email :

NOTE 1: PLEASE SEE NEXT PAGE FOR THE DECLARATION AND UNDERTAKING WHICH HAS TO BE FURNISHED ALONG WITH APPLICATION FORM.

**DECLARATION**

(to be made by the applicant)

I, ---------------------------------------- the applicant hereinabove, hereby declare that the particulars given above and in the attached statements are true and correct to the best of my knowledge and belief.

2. I also understand that my application is liable to be summarily rejected in case any of the information contained in this application is found incorrect.

3. I am aware of the statutory provisions of the Maharashtra Lokayukta Act, 2023 Dated 8$^{th}$ December, 2025 and the Maharashtra Lokayukta (Amendment) Act, 2025 Dated 26$^{th}$ December, 2025 laying down the necessary eligibility and other conditions.

4. I am also aware that provisions of section 8 of the Maharashtra Lokayukta Act, 2023 place restrictions on employment after ceasing to hold office of Chairperson and I agree to abide by the same with the full knowledge that after ceasing to hold such office, it shall render me ineligible for -

(i) re-appointment as the Chairperson or a Member of the body of Lokayukta;

(ii) further employment to any other office of profit under the State Government;

5. I expressly declare that-

(a) I am not a Member of Parliament or of any State/UT Legislature.
(b) I have not been convicted of any offence involving moral turpitude.
(c) I am not a Member of any Panchayat, Zilla Parishad, Nagar Panchayat, Municipal Council or Municipal Corporation.
(d) I am not a Member of a body, corporation or society, substantially financed by the State Government.
(e) A person dismissed or removed from service of the Union or a State;
(f) I am not associated with any political party;

Date : Signature of the applicant :

Place : Name in full :

Mobile No. :

Email :

# UNDERTAKING

I hereby undertake in terms of sections 3(4) & 8 of the Maharashtra Lokayukta Act, 2023 Act to adhere to all the conditions and specifically undertake, that in the event of selection and before entering upon the office of Chairperson, to-[please strike out whichever is not applicable]

(a) resign from the office of trust or profit, namely--------------------------, as presently held by me.

(b) sever my connection with the business, namely---------------------, presently conducted and managed by me.

(c) cease to practice my present profession, namely----------------------------

| | |
|---|---|
| Date: | Signature of the applicant: |
| Place: | Name in full: |
| | Mobile No.: |
| | Email : |

## INSTRUCTIONS:

1. Please provide information as sought within the space provided.

2. In case any additional information is required please attach separate sheets with due cross references under the specific column.

3. Every column should contain complete and specific information as sought, or please indicate "NIL" in case of non-applicability.

4. No application sent directly to the office of the Chairperson, Selection Committee will be entertained and must be routed through the mode as indicated in the advertisement dated 09th July, 2026.

5. Contact details may please be clearly specified.

6. No further correspondence shall be entertained with respect to the applications made.

7. The envelope containing the applications should clearly be superscribed by indicating that the application is for the position of Chairperson of the body of Lokayukta.

8. In case of making application through email the above condition (Sr.No.7) is required to be met by clear reflection in the subject.

9. Canvassing in support of the application is strictly prohibited.

10. The relevant statutory provisions of the Maharashtra Lokayuktas Act, 2023 Dated 8th December, 2025 and the Maharashtra Lokayukta (Amendment) Act, 2025 Dated 26th December, 2025 may kindly be perused before filling up this form.